**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक २६ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पेट्रोल आणि डिझेलची साठेबाजी रोखण्यासाठी नागरी पुरवठा आणि गृह विभागाकडून संयुक्त कारवाईचा मुख्यमंत्र्यांचा इशारा.**
2. **नवीन नागपूर आणि बाह्य वळण रस्त्यासाठी खरेदी करायच्या जमिनीसाठीचं मुद्रांक शुल्क माफ करण्याचा राज्यमंत्रिमंडळाचा निर्णय.**
3. **इंधन दरवाढ आणि महागाई विरोधात विरोधी पक्षांचं नागपूरसह ठिकठिकाणी आंदोलन.**
4. **भाजपनं चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेस नगरसेवकांना आर्थिक आमिष दाखवल्याचा विजय वडेट्टीवार यांचा आरोप.**

   **आणि**
5. **'सॅशे' या एकात्मिक इशारा प्रणालीद्वारे संपूर्ण देशात आपत्ती विषयक इशारे नागरिकांपर्यंत पोहोचवले जाणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

पेट्रोल डिझेलची साठेबाजी/फडणवीस

राज्यात पेट्रोल आणि डिझेलची मागणी लक्षणीयरित्या वाढली असून साठेबाजी थांबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी नागरी पुरवठा आणि गृहविभागाकडून संयुक्त कारवाई केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मंत्रालयात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना ही माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. राज्यातील पेट्रोलच्या मागणीत सरासरीपेक्षा २३ टक्के वाढ झाली असून डिझेलच्या मागणीत ५२ टक्के वाढ आहे. या वाढीव मागणीचाही पुरवठा केला जात असला, तरी त्यामुळे टंचाईसदृश स्थिती निर्माण होत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, कांद्याच्या प्रश्नासंदर्भात महायुतीचं सरकार संवेदनशील असून या प्रश्नावर दीर्घकालीन तोडगा काढण्याच्या दृष्टीनं उद्या नवी दिल्लीत केंद्र सरकारसोबत बैठक आयोजित करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांचा कांदा खरेदी करण्यासाठी सरकारनं बाजारात हस्तक्षेप सुरू

केला असून कांद्याला ३ रुपये भाव वाढवून तो १५ रुपये केला आहे. मात्र कांदा प्रश्नावर विरोधांकडून विनाकारण राजकारण केलं जात असल्याची टीकाही मुख्यमंत्र्यांनी केली.

मोदी सरकार १२ वर्ष

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला सत्तेत येऊन आज बारा वर्षं पूर्ण होत आहेत. ही बारा वर्षं म्हणजे भारताची संस्कृती आणि विकासमार्गात एक निर्णायक बदल घडवून आणणारा काळ असल्याचं मत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केलं. या काळात पायाभूत सुविधांचा विकास आणि निर्णायक जागतिक नेतृत्व तसंच मजबूत राष्ट्रीय सुरक्षा यांसह देशानं अभूतपूर्व प्रगती केली आहे, असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. भाजप अध्यक्ष नितीन नबीन यांनी या बारा वर्षांच्या काळाला, सुशासन आणि राष्ट्र प्रथम, या भावनेनं प्रेरित असलेला एक ऐतिहासिक प्रवास, असं म्हटलं आहे.

मंत्रिमंडळ निर्णय

नवीन नागपूर आणि नवीन बाह्य वळण रस्त्यासाठी खरेदी करायच्या जमिनीसाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मौजे गोदणी आणि मौजे लाडगाव (रीठी), ता. हिंगणा इथं खाजगी जमीन नवीन नागपूर आणि नवीन बाह्य वळण रस्ता प्रकल्पासाठी वाटाघाटीनं थेट खरेदी करावी लागणार आहे. या व्यवहारावरील नोंदणी शुल्क देखील माफ करण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यात आली असून त्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचं नियमन आणि शासकीय कर्तव्यं पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणेस मान्यता देण्यात आली आहे.

महागाईविरोधात आंदोलन

राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी इंधन दरवाढ आणि महागाई विरोधात नागपुरात सायकल रॅली काढून आंदोलन केलं. माजी मंत्री अनिल देशमुख आणि शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे यांच्या नेतृत्वात संविधान चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. यावेळी अनिल देशमुख यांनी इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून भाजीपाला, धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडल्याचा आरोप केला. तसंच शेती हंगामात डिझेलची टंचाई निर्माण झाल्यानं कृषी कामांवर परिणाम होत असल्याचं सांगत राज्य सरकारनं इंधनावरील

कर कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

कांदा हमी भाव

कांद्याला सध्या प्रति क्विंटल २००-३०० रुपये एवढा कमी भाव मिळत असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आजच्या विदारक परिस्थितीस केंद्र आणि राज्य सरकारच जबाबदार आहे, असा आरोप करत शेतकऱ्यांच्या कांद्याला भरीव हमीभाव मिळाल्याशिवाय काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडी स्वस्थ बसणार नाही, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव मिळावा, या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली इथं महाविकास आघाडीच्या वतीनं शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आला. यावेळी रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं.

ट्रॅक्टर-डबकी मोर्चा

यवतमाळ इथं काँग्रेसतर्फे इंधन तुटवडा, डीएपी-युरिया खतांची टंचाई, पीक विमा आणि खंडित वीज पुरवठ्याच्या प्रश्नांवर ट्रॅक्टर-डबकी मोर्चा काढण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत विविध मागण्यांचं निवेदन प्रशासनाला सादर केलं. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना खतटंचाई, बोगस बियाणं-कीटकनाशकं आणि वाढत्या इंधनदरांचा सामना करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. मोर्चात माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येनं सहभागी झाले. दरम्यान, यवतमाळमध्ये खरीप हंगामात कृषी यंत्राद्वारे शेत मशागतीची लगबग सुरू असून त्यासाठी शेतकऱ्यांना डिझेलची आवश्यकता लक्षात घेता जिल्हाधिकारी विकास मीना यांनी शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरच्या इंधन टाकीसह ४० लिटरच्या कॅनमध्ये डिझेल वितरित करण्याचे आदेश जारी केले आहेत.

विजय वडेट्टीवार

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपूर इथं पत्रकार परिषदेत भाजपवर चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेस नगरसेवकांना आर्थिक आमिष दाखवल्याचा आरोप केला आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे २३ नगरसेवक नॉट रिचेबल असल्याचा दावा करत संबंधितांवर अपात्रतेची कारवाई सुरू करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

भाजपकडून निवडणूक बिनविरोध करण्याबाबत चर्चा होत असली, तरी सर्व जागांबाबत एकत्रित निर्णय व्हावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. यावेळी वडेट्टीवार यांनी कांदा उत्पादक शेतकरी, कर्जमाफी आणि वाढती महागाई या मुद्द्यांवरूनही राज्य सरकारवर टीका केली.

नैऋत्य मोसमी पाऊस

नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमध्ये होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यातल्या १४ पैकी चार जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज असून या ठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हवामान

दूरसंचार विभाग, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि सी-डॉट यांच्या सहकार्यानं देशभरात मोबाईल-आधारित आपत्ती इशारा प्रणाली अधिक सक्षम करण्याचं काम सुरू आहे. 'सॅशे' या एकात्मिक इशारा प्रणालीद्वारे सध्या सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसएमएस आणि सेल ब्रॉडकास्ट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपत्तीविषयक इशारे नागरिकांपर्यंत पोहोचवले जात आहेत. देशभरात या प्रणालीच्या कार्यक्षमतेची चाचणी सुरू असून नागरिकांना हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये चाचणी संदेश प्राप्त होऊ शकतात. हे संदेश केवळ प्रणाली पडताळणीसाठी असून नागरिकांनी घाबरून न जाता सहकार्य करावं, असं आवाहन दूरसंचार विभागानं केलं आहे. येत्या काही तासांसाठी भंडारा, नागपूर, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यांसाठी वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाकडून जारी करण्यात आला आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. नागरिकांनी खराब हवामानाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेची काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान, विदर्भात उष्णतेची लाट कायम असून दुपारी अडीच वाजता चंद्रपूर आणि गडचिरोली इथं सर्वाधिक ४६ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. वर्धा आणि ब्रह्मपुरी इथं ४६ अंश, तर नागपुरात ४३ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आलं. अकोला आणि अमरावती इथं ४३ पूर्णांक २, गोंदियात ४३ पूर्णांक ४, तर बुलढाण्यात ३९.६ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

५०० वटवाघळांचा मृत्यू

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा इथं कडक उन्हामुळे सुमारे ५०० वटवाघळांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. २२ मे रोजी तापमान ४५ अंश सेल्सिअस पर्यंत

पोहोचल्यानं उष्माघातामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.चेतन पेदापल्ली यांनी व्यक्त केला. विषाणूजन्य आजारांचा धोका टाळण्यासाठी मृत वटवाघळांना खड्डा करून पुरण्यात आलं आहे.

बक्षीस जाहीर

चंद्रपूर मनपा आरोग्य विभागानं अवैध गर्भलिंग निदान केंद्रांविरोधात नागरिकांना माहिती देण्याचं आवाहन केलं असून माहिती देणाऱ्या व्यक्ती आणि डीकॉय ऑपरेशनमध्ये सहभागी गर्भवती महिलेला प्रत्येकी १ लाख रुपयांचं शासकीय बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. याशिवाय चंद्रपूर मनपातर्फे २५ हजार रुपयांचं अतिरिक्त बक्षीस दिलं जाणार आहे. नागरिकांनी अवैध केंद्रांची माहिती टोल फ्री क्रमांक 104, 18002334475, मनपा हेल्पलाईन 18002574010, व्हॉट्सॲप 8530006063 किंवा 'आमची मुलगी' या संकेतस्थळावर द्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स या संघात आज धर्मशाला इथं पात्रता फेरीतला पहिला सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल.

*****